# एका पक्षघाती माणसाची येशूशी भेट झाली

मुलांचे तारण करण्याची येशू ख्रिस्ताची इच्छा आहे हे त्यांना शिकवा. मुलांसाठी पुढीलपैकी कोणताही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी **मार्क 2:1-12** मधून पक्षघाती माणूस येशूला भेटतो हा **कथावृत्तांत्त** वाचून दाखवावा. यामध्ये तारण करणाया येशूची भेट घेण्यासाठी आपल्याला आपल्या मित्रांची कशी मदत करता येते ते दाखवले आहे.

कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर पुढील प्रश्न **विचारा :**

- येशू आल्याचे ऐकून त्या मित्रांनी काय केले? (पाहा वचने 2-3).
- आजारी माणसाच्या मित्रांनी त्याला येशूकडे कसे नेले? (4)
- त्या माणसाच्या मित्रांची कोणती गोष्ट येशूच्या लक्षात आली? (5)
- येशूने प्रथम त्या आजारी माणसाला काय सांगितले? (5)
- येशूचे शब्द ऐकून नियमशास्त्राच्या शिक्षकांच्या मनात कोणता विचार आला? (7)
- येशूला लोकांच्या पापांची क्षमा करण्याचे सामर्थ्य आहे हे त्याने कसे दाखवले? (10-12)

येशू एका पक्षघाती माणसाला बरे करतो ह्या मार्क 2:1-12 मधील कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा. मुलांकडून नाटिकेची तयारी करुन ह्या. तुम्ही सर्वच भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.

- **मोठया मुलांनी** किंवा मोठया माणसांनी पुढील भूमिका कराव्यात :

  **निवेदकः** कथावृत्तांत्त सांगा आणि मुलांकडून संवाद पाठ करुन घ्या.

  **येशू.**

  **लहान मुलांनी** पुढील भूमिका कराव्यात :

  **पक्षघाती माणूस**

  **चार मित्र**

  **लोक**

  **शास्त्री** (नियमशास्त्राचे शिक्षक)

### नाटिका, भाग 1, मार्क 2:1-4

**निवेदक :** कथावृत्तांत्ताचा पहिला भाग (वचने 1-4) सांगून म्हणा, ''आजारी माणसाचे मित्र काय म्हणतात ते ऐका.''

**मित्र 1 :** ''येशू त्या घरात आला आहे. आपण आपल्या पक्षघाती माणसाला घेऊन येशूकडे जाऊ या. येशू त्याला बरे करील.'' (चार मित्र आजारी माणसाला उचलून नेण्याचा अभिनय करतात).

**मित्र 2 :** ''पण त्या घरात तर चिक्कार गर्दी दिसत आहे!'' ''आपण त्या घरात जाणार कसे?''

**मित्र 3 :** ''आपल्या मित्राला उचलून घेऊन आपण त्या घरात कसे काय जाणार?''

**मित्र 4 :** ''आपण घरावर चढू या. तेथील कौले बाजूला काढून वाट तयार करू आणि त्याला दोरी लावून खाली सोडू''

**मित्र :** (चारहीजण) खुर्चीवर किंवा टेबलावर चढून घरावरील कौलं बाजूला करीत असल्याचा अभिनय करा.

## नाटिका, भाग 2, मार्क 2:5-7

**निवेदक :** कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग (वचने 5-7) सांगून म्हणा ''लोक काय बोलत आहेत ते ऐका.''

**लोक :** ''बघा! ती माणसे कौलं बाजूला करीत आहेत!''

''शी! सगळी घाण-कचरा माझ्या अंगावर पडला!''

''अरे पाहा, ते बाजेवरुन कोणाला तरी खाली सोडत आहेत!''

''अरे हे काय, तो तर माझ्या डोक्यावर येत आहे.''

''बाजूला व्हा! त्याला जागा द्या!''

**पक्षघाती माणूस :** चार मित्र कौले काढीत आहेत तिथे खाली पडून राहा.

**येशू :** वर पाहून म्हणा, ''मित्रांनो, तुमचा विश्वास मला समजला.'' (खाली पाहून त्या माणसाला स्पर्श करा). म्हणा, ''मुला तुझ्या पापांची क्षमा झाली आहे.''

**शास्त्री :** रागाने बोला. म्हणा, ''हा माणूस पापांची क्षमा कशी करतो? हा स्वत:ला समजतो तरी कोण?''

## नाटिका, भाग 3, मार्क 2:8-12

**निवेदक :** कथावृत्तांत्ताचा तिसरा भाग (वचने 8-12) सांगून म्हणा, ''येशूचे बोलणे ऐका.''

**येशू :** लोकसमुदायला म्हणा, ''मला पापांची क्षमा करता येते हे मी तुम्हांला दाखवतो.'' पक्षघाती माणसाला म्हणा, ''ऊठ, आपली बाज उचलून चाल!''

**पक्षघाती माणूस :** उडी मारा. म्हणा, ''देवाची स्तुती असो, मला चालता येते!'' (थोडे चाला) ''आता मी लुळा-पांगळा नाही, पाहा! माझ्या पातकांची क्षमा झालेली आहे!''

**लोक :** ''आम्ही देवाची स्तुति करतो!'' ''अशी गोष्ट घडलेली आम्ही यापूर्वी कधीही पाहिली नव्हती!''

**निवेदक :** नाटिका संपल्याचे जाहिर करा. नाटिकेसाठी मदत करणाऱ्या सर्वांचे आभार माना. मोठया माणसांनाही धन्यवाद द्या.

सांस्कृतिक दृस्टया मान्य असल्यास मुलांनी मोठया माणसांना प्रश्न विचारावा :''आमच्या जीवनातील सैतानी सामर्थ्यापासून आणखी कोणत्या मार्गांनी येशू आम्हांला वाचवतो?'' (लोकांना उदाहरणे देऊ द्या)

उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून मुलांसाठी पुढील **व्यवस्था करा...**

- उपासनेच्या दरम्यान प्रौढांसमोर नाटिका सादर करणे.
- सदर अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारणे.
- त्यांनी तयारी केलेली कविता आणि अन्य गोष्टी सादर करणे.

**कविता :** तीन मुलांना स्तोत्र 25:1,2 व 7 ही वचने प्रत्येकी एक या प्रमाणे म्हणायला सांगा.

हे परमेश्वरा, तुझ्याकडे मी आपले चित्त लावितो.

हे देवा, तुझ्यावर माझी श्रद्धा आहे, माझी फजिती होऊ देऊ नको, माझ्या वैऱ्यांना माझ्यावर विजयी होऊ देऊ नको.

हे परमेश्वरा, माझी तारुण्यातील पातके व माझे अपराध आठवू नको, तू आपल्या वात्सल्यानुसार माझे स्मरण कर.



पलंगाचे चित्र काढ़ा

- मोठया मुलांनी लहान मुलांना चित्र काढण्यात मदत करावी. हे चित्र त्यांना उपासनेच्या वेळी मोठया माणासांना दाखवता येईल.
- देव आमचे दुष्टपणा व आजाराच्या सर्व परिणामांपासून रक्षण करतो हेच रिकाम्या कबरेवरुन पहायला मिळते हे त्यांनी स्पष्ट करुन सांगावे.

**स्पष्ट करा.** ह्या जीवनात आपल्याला दु:ख सोसावे लागले तरी येशू आम्हांला नवे, ☐ चांगले असे सार्वकालिक जीवन देतो.

**पाठ करा** लूक 19-10

मोठया मुलांनी, त्यांनी प्रत्यक्ष आरोग्य मिळाल्याचे पाहिले असेल किंवा येशू त्यांच्या अंत:करणात कसा आला याविषयी कविता, गीत किंवा छोटीशी गोष्ट लिहावी.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, दुष्टपणामुळे होणाया दु:खावर तू मात करतोस, ह्या तुझ्या सामर्थ्याबद्दल आम्ही तुझी स्तुती करतो. तू कधी कधी आम्हांला बरे करतोस आणि नेहमीच आमच्या पातकांची क्षमा करतोस. आमच्या अंत:करणातून दुष्टपणा काढून टाकून नवे मरणावर मात करणारे जीवन दिलेस याबद्दल तुझे आभार मानतो. अखेरीस आम्ही तुझ्या बरोबर असणार आहोत तेव्हा तिथे दु:ख नसणार हे आम्हांला ठाऊक आहे''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net